महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३१९/प्रनिप्रा/३० एप्रिल/२०२४/१०१४ दिनांक : 13/5/24

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक ३० एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **८३व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, २) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), व ३) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य, १) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ यांनी अनुपस्थितीबाबत अवगत केले होते. तसेच २) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ४) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच वैद्य किशोरकुमार पी. मडावी, सहा. प्राध्यापक, आयुष संचालनालय, मुंबई व डॉ. सुमंत अ. खर्डेनविस, सहा. प्राध्यापक, आयुष संचालनालय, मुंबई यांचे प्रतिनिधी हे निमंत्रित संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ :** **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे (PGA; PGH; PGU; BAMS; BHMS and BUMS).**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधिल तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश बंद दिनांकानंतर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, आयुष शिक्षण

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

संचालनालय, मुंबई संचालकांच्या तपासणी अहवालासह विहित पध्दतीनुसार आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांबाबत अवलोकन करुन खालील प्रमाणे निर्देश देण्याात येत आहे,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

३) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील वैद्यकीय व आयुष शिक्षण विभागाअंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये उपसमिती गठित करण्यात आली आहे.

४) शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शि-२, दिनांक ९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकांच्या महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना मान्यता देण्याचे अधिकार देखील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत, असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** (राज्य शासनाची) व महानगरपालिका अखत्यारितीतील महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांना प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(च) नुसार " प्रक्रिया शुल्क " अदा करणे अनुज्ञेय राहील व तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

५) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) HILLY AREA, २) PWD, ३) DEFENSE, ४) MKB, ५) ORPHAN व ६) अनिवासी भारतीय (एनआरआय) /संस्था स्तरावरील अनिवासी भारतीय कोटयातील रिक्त जागांवर व ७) व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या प्रक्रियेसाठी प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये गठित करण्यात आल्यानुसार १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, मा. सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई -उपसमिती सदस्य व श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई -उपसमिती समन्वयक यांची उपसमिती गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननी करुन स्वयंस्पष्ट अहवाल ०१ महिन्यामध्ये प्राधिकरणास सादर करावा. तथापि सद्यस्थितीमध्ये सदरील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत नाही.

६) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत व प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम <u>(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तथापि, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

७) आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी उपसमितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि सदरील अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

८) प्रस्तूत प्रकरणी वरील परिच्छेद क्रमांक (७) मध्ये नमूद केल्यानुसार १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे <u>(प्रपत्र-अ)</u>, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार) कार्यवाही करावी.

<u>विषय क्रमांक २ :</u> <u>महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १७ तरतूदींनुसार वित्तिय वर्ष २०२३-२४ मधील वार्षिक लेखे (ANNUAL ACCOUNTS) सादर करणे.</u>

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे वित्तीय वर्ष २०२३-२४ चे एकत्रित आर्थिक लेखे तयार करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या एकत्रित लेखांचे अंतर्गत लेखापरिक्षण (INTERNAL AUDIT) झाले नसल्यामुळे त्यामध्ये किंचित बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, दोन्ही कार्यालयामार्फत कार्यालयीन आवश्यक बाबींवर करण्यात आलेल्या खर्चास (सामाईक प्रवेश परीक्षेच्या

y,

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

अनुषंगाने प्रवास खर्च, सीईटी/कॅप/प्रवेश प्रस्ताव मान्यतेच्या अनुषंगाने अदा करण्यात आलेले मानधन) तत्वत: मान्यता प्राप्त व्हावी यासाठी सदरील आर्थिक लेखे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले.

उक्त बाबी विचारात घेता प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे वित्तीय वर्ष २०२३-२४ मधील एकत्रित आर्थिक लेखे तत्वता: मंजुर करण्यात आले.

**विषय क्रमांक ३** **मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **पिल्लाई कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास CAP द्वारे वाटप करण्यात आलेला श्री. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्याचा प्रवेश ऑनलाईन निश्चित करण्याबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०३/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार, प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधी विहित केलेले सर्व कागदपत्रे तपासणी / छाननी कुरुन अहवाल त्वरीत सादर करण्याबाबत प्राधिकरणाचे दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संचालकांना कळविण्यात आले होते. त्यानुसार, संचालकांनी दिनांक १९/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे,-

> “.....विभागीय कार्यालय, मुंबई यांनी संदर्भाधीन दि.१५.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेली माहिती विचारात घेता, प्रवेश प्रक्रियेनंतर इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमात कॅप मायनॉरिटीमध्ये ३ जागा रिक्त आहेत. तसेच इन्स्टिट्युट लेव्हल कोटयामध्ये १ जागा रिक्त असल्याने व विद्यार्थ्याच्या शैक्षणिक हितास्तव सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांनी सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत केलेल्या शिफारशीस संचालनालय सहमत असून सदर पत्र सहपत्रासह यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.”

तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांनी दिनांक १५/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केले आहेत,-

> “......शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पनवेल या संस्थेत प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी मधील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमात कु. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्यास केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमधुन प्रवेश मिळाला होता. संबधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा ऑटो फ्रिझ असल्याने प्रवेश प्रणालीव्दारे आपोआप निश्चित झाला. तद्नंतर संबधित विद्यार्थ्याने संस्थेत प्रवेश फी भरणा करुन नियमित तासिकेस उपस्थित राहू लागला. संस्थेने प्रवेश यादी व एनरोलमेंट यादीची पडताळणी केल्यानंतर संबधित विद्यार्थ्याचा प्रवेश CET च्या पोर्टलवर निश्चित झाला नसल्याचे निदर्शनास आले असल्याचे नमुद केले होते.”

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी सदर विद्यार्थ्याचे प्रवेशासंबंधी विहित केलेले सर्व कागदपत्रे तपासणी/छाननी करुन अहवाल सादर करण्यांस कळविलेले होते. त्यानुसार कु. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्यांचे प्रवेशासंबंधीत कागदपत्रे तपासणी करण्यात आली असून सदरील विद्यार्थी प्रवेशास पात्र असल्याची बाब स्पष्ट करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी कार्यारलयाद्वारे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रवेश प्रक्रियेनंतर इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमात कॅप मायनॉरिटी मध्ये ३ जागा रिक्त आहेत तसेच इंस्टिटयुट लेव्हल कोटयामध्ये १ जागा रिक्त आहे. संस्थेत सदर अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त असल्याने व संस्थेने सादर केलेला खुलासा व वस्तुस्थिती विचारात घेता विद्यार्थ्याच्या शैक्षणिक हितास्तव सदर प्रवेश ऑनलाईन निश्चित करण्याकरिता वरील प्रमाणे करण्यात आली आहे.

वरील बाबी तसेच प्रवेशित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता महात्मा एज्युकेशन सोसायटीचे, पिल्लाई कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नवीन पनवेल येथील प्रथम वर्ष व्यावसायिक अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्याच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC CODE : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(ख) <u>मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रमनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर.</u>

प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता सोबत जोडलेल्या **<u>प्रपत्र- ब</u>** मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास **<u>प्रपत्र - ब मध्ये नमूद केल्यानुसार</u>** दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC CODE : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात उर्वरित प्रकरणे प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

(ग) मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या निर्देशानुसार संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या मुळ नस्तीसह उपस्थित राहण्याचे निर्देश असलेली महाविद्यालये खालीलप्रमाणे,-

१) AR६८१८ : ब्रिक्स स्कुल ऑफ आर्किटेक्चर, पुणे - प्रथम वर्ष वास्तुशास्त्र / शैक्षणिक वर्ष २०१७-१८.

सदरील महाविद्यालय प्राधिकरणासमोर सुनावणी अनुपस्थित राहिले असल्याने, याबाबत नोंद घेण्यात आली. त्यामुळे सदरील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली.

२) DSE३१९३ : शिवाजीराव एस. जोंधळे अभियांत्रिकी महाविद्यालय, डोंबिवली, मुंबई - थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / शैक्षणिक वर्ष २०२१-२२.

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. पी.आर. रोडगे, प्राध्यापक हे सुनावणीस उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील शिवाजीराव एस. जोंधळे अभियांत्रिकी महाविद्यालय, डोंबिवली, मुंबई या महाविद्यालयातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास एकुण प्रवेशित १६३ विद्यार्थ्यांपैकी १६० विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक १५/०६/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित ०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही.

त्याअनुषंगाने, सदर महाविद्यालयाने दिनांक २४/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये ०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत पुनर्विलोकन अर्ज सादर केलेला आहे. या संदर्भात दिनांक ०८/०२/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर महाविद्यालयाने दिनांक १३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित कागदपत्रे सादर केली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या सुनावणी निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक २१/०७/२०२३ रोजी प्राधिकरणाकडे निवेदन सादर केले. सदरील निवेदन संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना पुनःश्च पडताळणीकरिता दिनांक ०५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचा दिनांक ०५/१२/२०२३ रोजीचा खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झालेला आहे,-

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| Sr. No. | Name of the Candidate | Discrepancy | Directorate Report | |
|---|---|---|---|---|
| | | | Submitted Documents for Re-verification | Director's Remark |
| 1 | Gajkosh Shankesh Ganpat | LC Not submitted | Candidate has provided Leaving Certificate | Eligible |
| 2 | Bhalerao Rupesh Nandu | LC Required | Candidate has provided Leaving Certificate | Eligible |
| 3 | More Hemant Ramesh - | NCL | Candidate has provided Non-Creamy Layer Certificate | Eligible |

यापूर्वी सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशांना संबंधित संचालक यांनी शिफारस केली नव्हती, परंतू संचालकांच्या पुन:श्च पडताळणीअंती कागदपत्रांची पूर्तता झाल्याने त्यांनी पात्रतेची शिफारस केली असल्याची बाब स्पष्ट आहे.

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता शिवाजीराव एस. जोंधळे अभियांत्रिकी महाविद्यालय, डोंबिवली, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित वरील तालिकेतील नमूद ०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३) <u>PH६९५२ : महादेव कांचन कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे - प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र / शैक्षणिक वर्ष २०२०-२१.</u>

<u>आणि</u>

४) <u>DSP६९५२ : महादेव कांचन कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे - थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र / शैक्षणिक वर्ष २०२०-२१.</u>

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री. विजयकुमार व्ही. काळे, प्राचार्य व कु. दिप्ती पारसे व कु. तृप्ती ठोंबरे, संबंधित विद्यार्थीनी हे सुनावणीस उपस्थित होते.

प्रस्तूत प्रकरणी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दिनांक २३/०२/२०२४ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली.

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर महाविद्यालयातील त्रुटी असलेल्या कु. दिप्ती पारसे पोपट या विद्यार्थिनीच्या जात वैधता

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra S...

प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे सदर विद्यार्थिनी अपात्र असल्याबाबतचा अहवाल सादर केला होता, त्याअनुषंगाने, प्राधिकरणाच्या दि.३१.०७.२०२३ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. ४ (ख) नुसार श्रीमती महादेव कांचन कॉलेज ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयातील कु.दिप्ती पोपट पारसे हया विद्यार्थीनीचा प्रवेश अपात्र करण्यात आला तिचा प्रवेश संस्थास्तरावरील असल्याने राखीव संवर्गाची प्रमाणपत्रे सादर करणे बंधन कारक आहे अथवा कसे याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय देण्याबाबत प्राधिकरणाचे दिनांक १३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संचालकांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार संचालनालयाने सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे कडून दिनांक १२.०२.२०२४ रोजीच्या पत्रानुसार प्राप्त झालेली खालीलप्रमाणे माहिती व अभिप्राय सादर केलेली आहे.

"संबंधित संस्थेने दि.०५.०१.२०२४ रोजींच्या पत्रान्वये कु.दिप्ती पोपट पारसे हया विद्यार्थीनीचा प्रवेश खुल्या प्रवर्गात ग्राहय धरुन तो नियमित करण्याबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्याकडे विनंती केली. सहसंचालक यांनी सदर पत्र व सहपत्राबरोबर असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये शिल्लक राहिलेली PWD हया जागेवर संस्थास्तरावरील ACAP प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यामध्ये PWD प्रवर्गातील विद्यार्थी उपलब्ध न झाल्याने पुढील टप्प्यात सदर PWD ची जागा खुली करुन या जागेवर सदर विद्यार्थीनीस गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आलेला असून विद्यार्थीनीने कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नाही.

तसेच कु.दिप्ती पोपट पारसे हया विद्यार्थीनीने प्रवेश प्रक्रिया नोंदणी करते वेळी जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे तिच्या अर्जामधील Category for Admission या रक्यान्यामध्ये जात प्रवर्गासमोर $ हे चिन्ह दर्शविले होते. यास्तव सदर विद्यार्थीनी खुल्या प्रवर्गात मोडत असून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तिके प्रमाणे खुल्या प्रवर्गासाठी आवश्यक पात्रता निकष पुर्ण करत आहे. विद्यार्थीनी SC प्रवर्गात मोडत असली तरी तिच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे तिचा प्रवर्ग एस.सी. वरुन खुल्या प्रवर्गात होऊन ती खुल्या प्रवर्गाच्या जागेवर प्रवेश घेण्यास पात्र असल्याचे नमूद केले आहे."

कु. दिप्ती पोपट पारसे या विद्यार्थीनीच्या शैक्षणिक हितास्तव तिच्याकडून नोंदणी शुल्कामधील खुला प्रवर्ग व राखीव प्रवर्ग यांचेसाठी आवश्यक नोंदणी शुल्काच्या फरकाची रक्कम विद्यार्थीनीकडून वसुल करुन, गुणवत्ता यादीमधील तिच्या प्रवेशास असलेली त्रुटी निरंक करुन, संस्थास्तरावरील प्रवेशासाठी राखीव संवर्गाची प्रमाणपत्रे आवश्यक नसल्याचे ग्राहय धरुन तिचा प्रवेश नियमित करण्यासाठी सहसंचालक यांनी शिफारस केली आहे. विद्यार्थीनीने संस्थास्तरावर ACAP मध्ये प्रवेश घेतला असला तरी तिने प्रवेशावेळी नोंदणी करतेवेळी अनु. जाती (SC) प्रवर्गातून नोंदणी केलेली होती. तिच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसुन संस्थेनेही सदर विद्यार्थीनीचा प्रवेश खुल्या प्रवर्गात ग्राहय धरण्याची विनंती केली. त्यानुसार या विद्यार्थीनीचा प्रवर्ग खुला प्रवर्ग धरुन तदनंतर प्रवेश नियमित करण्याबाबत प्राधिकरण स्तरावरुन निर्णय घेण्याबाबत संचालकांनी अहवाल सादर केला आहे.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

सदरील विद्यार्थिनीच्या प्रवेशास संबंधित संचालक यांनी शिफारस केली नव्हती, परंतू संचालकांच्या पुनःश्च पडताळणीअंती, कु. दिप्ती पोपट पारसे या विद्यार्थीनीच्या शैक्षणिक हितास्तव तिच्याकडून नोंदणी शुल्कामधील खुला प्रवर्ग व राखीव प्रवर्ग यांचेसाठी आवश्यक नोंदणी शुल्काच्या फरकाची रक्कम विद्यार्थीनीकडून वसुल करुन, गुणवत्ता यादीमधील तिच्या प्रवेशास असलेली त्रुटी निरंक करुन, संस्थास्तरावरील प्रवेशासाठी राखीव संवर्गाची प्रमाणपत्रे आवश्यक नसल्याचे ग्राहय धरुन तिचा प्रवेश नियमित करण्यासाठी संचालकांनी पात्रतेची शिफारस केली आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महादेव कांचन कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे DSP६९५२ या महाविद्यालयातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास एकुण प्रवेशित ३१ विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित ०१ विद्यार्थ्याच्या प्रवेशामध्ये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही.

त्याअनुषंगाने, सदर महाविद्यालयाने दिनांक २२/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुनर्विलोकन अर्ज सादर केलेला आहे. या संदर्भात दिनांक २६/०७/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर महाविद्यालयाने दिनांक ०२/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित कागदपत्रे सादर केली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक ०९/०९/२०२२ रोजीच्या सुनावणी निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. २ ड मधील निर्णयाच्या अनुषंगाने, पुनर्विलोकन याचिकांचे सुनावणी निर्णयाबाबत महाविद्यालयांच्या निवेदनांच्या अनुषंगाने, महाविद्यालयाने सादर केलेली विद्यार्थ्यांच्या त्रुटींची कागदपत्रे तपासून आवश्यक त्या शिफारशीसह सचिव, प्रनिप्रा सादर करतील असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने, दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्राने संबंधीत संचालकांकडून कालबद्ध पडताळणी कार्यक्रम आयोजित करुन, पत्रात नमूद केलेल्या SOP प्रमाणे अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक १४/०९/२०२३ रोजीचा खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

| Sr. No. | Name of the Candidate | Discrepancy | Directorate Report | |
|---|---|---|---|---|
| | | | Submitted Documents for Re-verification | Director's Remark |
| 1 | Thombare Trupti Dnyandev | No Caste Validity Certificate | Caste validity | विद्यार्थ्याने जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. सदर प्रमाणपत्र सादर करावयाच्या अंतिम दिनांकानंतर निर्गमित झालेले आहे. विद्यार्थ्याचा प्रवेश एन टी-सी या |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| Sr. No. | Name of the Candidate | Discrepancy | Directorate Report | |
|---|---|---|---|---|
| | | | Submitted Documents for Re-verification | Director's Remark |
| | | | | प्रवर्गातून झाला आहे. यास्तव विद्यार्थी राखीव प्रवर्गातून प्रवेश मिळण्यास पात्र नाही. |

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश बंद दिनांक ५/०२/२०२१ होती. सदर विद्यार्थिनीने दिनांक ८/०३/२०२१ रोजीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच सदर विद्यार्थिनीचा प्रवेश एन टी-सी (GNTC) या प्रवर्गातुन झालेला असल्याने सदर विद्यार्थिनीने विहीत कालावधीतील जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. असे कळविले आहे.

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता महादेव कांचन कॉलेज ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. त्रुप्ती ज्ञानदेव ठोंबरे या विद्यार्थीनीच्या प्रवेश प्रवर्ग बदल करुन खुल्या प्रवर्गातुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५) <u>EN३४४५ : विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट विश्वात्मक ओम गुरुदेव अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे - प्रथम वर्ष अभियांत्रिकी / शैक्षणिक वर्ष २०२१-२२.</u>

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री. जी.ई. चव्हाण, उप-प्राचार्य हे सुनावणीस उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विश्वातमक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट विश्वातमक ओम गुरुदेव अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे EN३४४५ या महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास एकुण प्रवेशित ६० विद्यार्थ्यांपैकी ५२ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक १५/०६/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित ०८ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली नाही.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

त्याअनुषंगाने, सदर महाविद्यालयाने दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ०८ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत पुनर्विलोकन अर्ज सादर केलेला आहे. या संदर्भात दिनांक २९/०६/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर महाविद्यालयाने दिनांक ०७/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित कागदपत्रे सादर केली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक १७/०७/२०२३ रोजीच्या सुनावणी निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक १२/०८/२०२३ रोजी प्राधिकरणाकडे निवेदन सादर केले. सदरील निवेदन संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना पुन:श्च पडताळणीकरिता दिनांक ०५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचा दिनांक ०५/१२/२०२३ रोजीचा खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झालेला आहे.

| Sr. No. | Name of the Candidate | Discrepancy | Directorate Report | |
|---|---|---|---|---|
| | | | Submitted Documents for Re-verification | Director's Remark |
| 1. | Kashid Swapnil Sukhdev | No Document | Candidate has provided Admission related document | Eligible |
| 2. | Harad Manish Sunil | Caste Validity Pending | Caste Validity Certificate issued on 5/07/2021 | Eligible |
| 3. | Sairaj Sharad Patil | Migration Certificate Required | Candidate has provided Migration Certificate | Eligible |
| 4. | Igole Rahul Arjun | HSC Marksheet | Candidate has provided HSC Marksheet | Eligible |

सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशांना संबंधित संचालक यांनी शिफारस केली नव्हती, परंतू संचालकांच्या पुन:श्च पडताळणीअंती कागदपत्रांची पूर्तता झाल्याने त्यांनी पात्रतेची शिफारस केली आहे.

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता विश्वातमक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट विश्वातमक ओम गुरुदेव अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे या महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित उक्त तालिकेतील नमूद ०४ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

६) <u>DSE५३८१ : श्री जयकुमार रावल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे - थेट द्वितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी / शैक्षणिक वर्ष २०२०-२१.</u>

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री. संदिप एन. साठे, वरिष्ठ लिपिक व कु. सुर्यकांत प्रकाश अहिरे संबंधित विद्यार्थी हे सुनावणीस उपस्थित होते.

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दि. १८/०८/२०२३ रोजीचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ST प्रवर्गातल्या विद्यार्थ्याच्या प्रवेशाच्या त्रुटी बाबतच्या पत्राची नोंद घेण्यात आली.

श्री जयकुमार रावल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये अहिरे सुर्यकांत प्रकाश या विद्यार्थ्याने थेट द्वितीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी पदवी या अभ्यासक्रमास ST प्रवर्गातून प्रवेश घेतला होता.

शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मधील गुणवत्ता यादी पडताळणी करताना संबंधित विद्यार्थ्याची कागदपत्रे तपासली असता संबंधितांनी अनावधानाने Non Creamy Layer त्रुटी असल्याची दर्शविण्यात आली. परंतु सदर विद्यार्थी हा ST प्रवर्गाचा असून त्याची सिट टाईप ST प्रवर्गातील आहे.

सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशाच्या यादीतील नावासमोर अनावधानाने दर्शविलेली त्रुटी ST प्रवर्गासाठी लागु होत नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्याची त्रुटी निरंक समजण्यात यावी व सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशास मान्यता देण्यात यावी, अशी विनंती संचालकांनी दिनांक १८/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

सदर प्रकरणी संचालकांच्या पडताळणी अहवालानुसार प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये श्री जयकुमार रावल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास प्रवेशित एकुण २४७ विद्यार्थ्यांपैकी २४५ पात्र विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत त्रुटी असल्याने मान्यता देण्यात आलेली नाही.

उपरोक्त प्रमाणे त्रुटी असलेल्या ०२ विद्यार्थ्यांपैकी कु. अहिरे सुर्यकांत प्रकाश या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत Non Creamy Layer certificate not provided for verification अशी त्रुटी असल्यामुळे सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशास मान्यता देण्यात आलेली नाही.

संचालकांच्या दिनांक १८/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, सदर विद्यार्थी ST प्रवर्गाचा आहे ST प्रवर्गाच्या उमेदवारांना Non Creamy Layer certificate आवश्यक नाही. सबब, सदर विद्यार्थ्याच्या प्रवेशाच्या यादीतील नावासमोर अनावधानाने दर्शविलेली त्रुटी ST प्रवर्गासाठी लागु होत नाही. असे कळविले आहे.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता श्री. जयकुमार रावल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे या

महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. अहिरे सुर्यकांत प्रकाश या विद्यार्थ्याच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

७) **MP६३७२ : पीडीइए चे सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे - पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र / शैक्षणिक वर्ष २०२१-२२.**

सदरील महाविद्यालय प्राधिकरणासमोर सुनावणी अनुपस्थित राहिले असल्याने, याबाबत नोंद घेण्यात आली. त्यामुळे सदरील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली.

८) **MB६१९५ : झील एज्युकेशन सोसायटीचे, झील इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर ॲप्लिकेशन, पुणे - एमबीए / शैक्षणिक वर्ष २०२१-२२.**

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री. धिरज एस. यादव, प्रशासकीय सहाय्यक हे सुनावणीस उपस्थित होते.

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २६/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये झील एज्युकेशन सोसायटीचे, झील इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर ॲप्लिकेशन, पुणे येथे एमबीए अभ्यासक्रमास प्रवेशित १०९ विद्यार्थ्यांपैकी एकूण १०३ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित ०६ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अहवालानुसार त्रुटी दर्शविण्यात आल्याने अशा प्रवेशांना प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक २७/०९/२०२२ रोजी पुनर्विलोकन अर्ज प्राधिकरणास सादर केला, या संदर्भात दिनांक ०२/१२/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे दिनांक १४/१२/२०२२ रोजीच्या सुनावणी निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन अर्ज रद्द करण्यात आला.

यासंदर्भात संबंधित महाविद्यालयाने दिनांक १३/१०/२०२३ रोजी प्राधिकरणाकडे प्रवेश मान्यतेबाबत निवेदन सादर केले. सदरील निवेदन संचालक, तंत्रशिक्ृषण संचालनालय, मुंबई यांना पुनःश्च पडताळणीकरिता दिनांक २९/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक २६/०२/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये संबंधित ०६ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे,-

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| Sr. No. | Name of the candidate | Discrepancy | Submitted Documents for Re-Reverification | Director's Remark |
|---|---|---|---|---|
| 1. | Phadtare Ajit Shivaji | Graduation Marksheet | Graduation Marksheet submitted. | Eligible |
| 2. | Sharmale Abhishek Bhausaheb | Transfer Certificate / Leaving Certificate | Admission Cancelled | Not Eligible |
| 3. | Dalavi Rahul Annaso | Graduation Marksheet | Graduation Marksheet submitted. | Eligible |
| 4. | Rishikesh Chandrakant Kikale | Graduation Marksheet | Graduation Marksheet submitted. | Eligible |
| 5. | Mohite Rohan Sambhaji | Graduation Marksheet | Admission Cancelled | Not Eligible |
| 6. | Ghule Nutan Ashok | Graduation Marksheet and Transfer Corticate / Leaving Certificate | Graduation Marksheet and Transfer Corticate Submitted. | Eligible |

संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी शिफारस केली नव्हती, परंतु संचालकांच्या पुन:श्च पडताळणीअंती कागदपत्रांची पुर्तता झाल्याने संचालकांनी ०६ विद्यार्थ्यांपैकी ०४ विद्यार्थी पात्र व ०२ विद्यार्थी प्रवेश रद्द असल्याने अपात्र अशी शिफारस केली आहे.

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता झील एज्युकेशन सोसायटीचे, झील इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर ॲप्लिकेशन, पुणे या महाविद्यालयातील एमबीए अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित उक्त तालिकेतील पात्र असलेल्या ०४ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे.

सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

९) **PH५४५१ : डॉ. एन्. जे. पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर - प्रथम वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र / शैक्षणिक वर्ष २०२२-२३.**

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्रीमती अनुराधा के. चव्हाण, प्राचार्य हे सुनावणीस उपस्थित होते.

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक २६/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये डॉ. एन. जे. पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर येथे व्यावसायिक पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित १०३ विद्यार्थ्यांपैकी एकूण १०० विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक २७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित ०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अहवालानुसार त्रुटी दर्शविण्यात आल्याने सदर प्रवेशास प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक ११/०९/२०२३ रोजी कु. दरकुंडे प्रतिक बाळासाहेब या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेकरिता पुनर्विलोकन अर्ज प्राधिकरणास सादर केला, या संदर्भात दिनांक २६/०९/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे दिनांक १६/१०/२०२३ रोजीच्या सुनावणी निर्णयान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन अर्ज रद्द करण्यात आला.

यासंदर्भात संबंधित महाविद्यालयाने दिनांक ०२/११/२०२३ रोजी प्राधिकरणाकडे प्रवेश मान्यतेबाबत निवेदन सादर केले. सदरील निवेदन संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना पुनःश्च पडताळणीकरिता दिनांक २९/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक २६/०२/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये संबंधित विद्यार्थी कु. दरकुंडे प्रतिक बाळासाहेब या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे,-

| Sr. No. | Name of the candidate | Discrepancy | Submitted Documents for Re-Reverification | Director's Remark |
|---|---|---|---|---|
| 1. | Darkunde Pratik Balasaheb | Candidate had provided EWS certificate in Annexure (Central List) with certificate number 42081357245, Dtd 19/5/22, hence not recommended. Now candidates provide EWS certificate in Annexure A with certificate number 42081433461, | Now candidate had provided EWS certificate in Proforma A (State Government Format) Certificate no. 42081433461 of dated 01/02/2023 (Which is of after Cut-off date of | Eligible |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

| Sr. No. | Name of the candidate | Discrepancy | Submitted Documents for Re-Reverification | Director's Remark |
|---|---|---|---|---|
| | | dtd.1/2/23 which is of after valid date for EWS (i.e.) 05/01/2023). | admission) for reverification on 05/12/2023. | |

सदरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी शिफारस केली नव्हती, परंतु संचालकांच्या पुन:श्च पडताळणीअंती कागदपत्रांची पुर्तता झाल्याने संचालकांनी पात्रतेची शिफारस केली असल्याची बाब स्पष्ट आहे.

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता डॉ. एन. जे. पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर या महाविद्यालयातील पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित कु. दारकुंडे प्रतिक बाळासाहेब यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०) <u>२५८१२०२४ : श्रीमती गीता बनकर महिला कॉलेज व एज्युकेशन, सांगोला - बी.एड / शैक्षणिक वर्ष २०२०-२१.</u>

सदरील महाविद्यालयाच्या सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. कांगुडे दिगंबर सौदाकर, लिपिक हे सुनावणीस उपस्थित होते.

प्रस्तूत प्रकरणी सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून, पुढील सुनावणी दिनांक ३०/०५/२०२४ रोजी घेण्यात येईल. तसे संबंधितांना कळविण्यात यावे.

११) <u>२६८११००२ : एम व्हि पी एस कॉलेज ऑफ एज्युकेशन, नाशिक - बी.एड / शैक्षणिक वर्ष २०२०-२१.</u>

सदरील महाविद्यालयाच्या सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. चंद्रकांत बोरसे, प्राचार्य व श्री. वाळेकर संतोष नामदेव, लिपिक हे सुनावणीस उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत बोरसे यांनी दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सुनावणी प्रवेशा संदर्भात सादर पुनर्विलोकन याचिके मागे घेत असल्याचे लिखित स्वरुपात सादर केले तद्नुषंगाने सदरील पुनर्विलोकन याचिकेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नसल्याने, याबाबत नोंद घेऊन सदरील प्रकरणी निकाली काढण्यात आले.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

१२) <u>२६८११००२ : एम व्हि पी एस कॉलेज ऑफ एज्युकेशन, नाशिक – एम.एड / शैक्षणिक वर्ष २०२०-२१.</u>

सदरील महाविद्यालयाच्या सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. चंद्रकांत बोरसे, प्राचार्य व श्री. वाळेकर संतोष नामदेव, लिपिक हे सुनावणीस उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत बोरसे यांनी दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सुनावणी प्रवेशा संदर्भात सादर पुनर्विलोकन याचिके मागे घेत असल्याचे लिखित स्वरुपात सादर केले तद्नुषंगाने सदरील पुनर्विलोकन याचिकेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नसल्याने, याबाबत नोंद घेऊन सदरील प्रकरणी निकाली काढण्यात आले.

१३) <u>०४१७०७००८१०५ : कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपुर – विधी ५ वर्ष / शैक्षणिक वर्ष २०१८-१९.</u>

सदरील सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री. मिलिंद मधुकर हेगडे व संबंधित विद्यार्थी हे सुनावणीस उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपुर येथे विधी ५ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित ३३ विद्यार्थ्यांपैकी एकूण २८ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दि.२९/०३/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित ०५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

संबंधित महाविद्यालयाने दिनांक १७/१०/२०२३ रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक ०७/११/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक ०६/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

तद्नंतर संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाकडे दिनांक ०२/०३/२०२४ रोजी मान्यतेसाठी सादर केला. संचालक, उच्चशिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक २७/०२/२०२० रोजीच्या अहवालामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे,

| Sr. No | Name Of The Candidate | Director's Remark |
|---|---|---|
| 1 | Samarthsing Sudhir Pol | Certified |
| 2 | Dilipkumar Baloji Salunkhe | Certified |
| 3 | Priyanka Balaji Pawar | Caste Certificate - Not Valid – Physically Documents Not Presented At The Time Of Documents Verification |
| 4 | Mauli Pandurang Pawar | Admission Cancelled at College Level. |
| 5 | Dipak Sanjay Chandanshive | Admission Cancelled at College Level. |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशांना संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी शिफारस केली नव्हती, परंतू संचालकांच्या पुन:श्च पडताळणीअंती कागदपत्रांची पूर्तता झाल्याने त्यांनी पात्रतेची शिफारस केली आहे.

वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपुर या महाविद्यालयातील विधी ०५ वर्ष अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित कु. समर्थसिंग सुधीर पोळ व कु. दिलिपकुमार बालोजी सांळुखे या ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(घ) <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयाच्या हाऊसकीपिंग सर्व्हिसेस संदर्भात e-Tending प्रक्रिया GeM-Portal वरुन राबवून पात्र ठरलेल्या सेवापुरवठादारास S.K. Enterprises या बाह्य-यंत्रणा संस्थेमार्फत हाऊसकीपिंग सर्व्हिसेसच्या कामासाठी दर्शविलेल्या दरास मान्यता देण्याबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक २७/०४/२०२४ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता संचालक, आयुष शिक्षण, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये

(J. P. Dange)
Chairman
Admission Regulating Authority,
Maharashtra State

सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 13/5/24